**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १०८७/२०२२**

**तक्रारकर्ता,श्री.मंगेश महादेव लाड.**
समजा समता कामगार संघ (नवी मुंबई) शॉप नं.१,
सिडको शॉपिंग कॉम्पलेक्स, चौधरी मेडीकलच्या मागे,
सेक्टर ७ चर्चच्या समोर, सानपाडा, नवी मुंबई.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,
डी विभाग तुर्भे, नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१,
किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर १५-ए,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,
डी विभाग तुर्भे, नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१,
किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर १५-ए,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १४.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १९.०४.२०२२ | -- | ०६.०६.२०२२ | २२.०६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि. २५.०७.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *"माहिती दिलेली नाही."* असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १४.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्त्याचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" उद्यान विभागतील ठेकेदारांना देण्यात आलेल्या देयकांची माहिती.*

1) *सद्यस्थितीत सुरु असलेला ठेका सुरु झाल्याबाबत सानपाडा तुर्भे विभाग कार्यालयाअंतर्गत उद्यान संरक्षण व संवंधनाच्या कामासाठी नियुक्त ठेकेदारास सद्यस्थितीतील ठेका दिल्यापासूनच्या सर्व देयकांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन मिळाव्यात.*
2) *उद्यान संवंधनाच्या कामासाठी नियुक्त कामगारांना देण्यात आलेल्या वेतन रजिस्टरच्या, बोनस र जिस्टरच्या, पी.एफ चलन, ई.एस.आय.सी. चलन, हजेरी रजिस्टरच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन मिळाव्यात."*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीस उपस्थित तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणी दरम्यान असे निवेदन केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.
तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, डी विभाग तुर्भे, नवी मुंबई महानगरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, डी विभाग तुर्भे, नवी मुंबई महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १९.०४.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती

पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा पुढील सुनावणीच्यावेळी त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२७.११.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, डी विभाग तुर्भे, नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१, किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर १५-ए, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,
डी विभाग तुर्भे, नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१,
किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर १५-ए,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. **यांचेमार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ